**कैलास नागरे यांना न्याय मिळवून दिल्याशिवाय शिवसेना स्वस्त बसणार नाही** >> पान 2

**देवेंद्र फडणवीस गजनी आहेत का ? : हर्षवर्धन सपकाळ** >> पान 3

**केंद्रीय मंत्री ना. जाधव यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतली सहपरिवार सदिच्छा भेट** >> पान 4

**सुविचार**

जीवन एक सुंदर प्रवास आहे, त्याचा आनंद घ्या.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 230 ■ गुरुवार, दि. 03 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




**काय चाललंय? लग्नापूर्वीच 'या' अभिनेत्रीच्या बेबी बंपचा व्हिडिओ व्हायरल, चर्चांना उधाण..** आतील पान

# राज्यात अवकाळी पावसाचा कहर!

## रब्बी पिकांना मोठा फटका; शेतकऱ्यांचा तोंडचा घास हिरावला

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : ऐन उन्हाळ्यात अवकाळी पावसाने राज्यातील अनेक भागात दमदार हजेरी लावली आहे. तर एप्रिलचा पहिल्या आठवड्यातील काही दिवस अवकाळीचे ढग अजून गडद होण्याची शक्यता आहे. अशातच अकोल्यात सलग दुसऱ्या दिवशी पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालंय. बाळापुर तालुक्यातल्या कांदा आणि केळी उत्पादक शेतकऱ्याला याचा मोठा फटका बसलाय. बाळापुर तालुक्यातल्या तामशी गावात कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अवकाळी पावसाचा फटका बसलाय. काढणी करून कापण्यासाठी ठेवलेला शेतातला कांदा अक्षरशः अवकाळी पावसाच्या पाण्याने भिजलाय. यात जवळपास हजारो क्विंटल कांद्याचं नुकसान झालं आहे.**







हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, अकोल्यात अवकाळी पावसानं काल (१ एप्रिलच्या) रात्रीच्या सुमारास पावसाने हजेरी लावली आहे. यात कांदा आणी केळी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालं आहे. बाळापुर तालुक्यात रात्री अवकाळी पावसाचा कहर होता. याशिवाय सोबत वारा देखील वाहत होता. या वाऱ्यामुळे अनेक केळी उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झालंय. वाऱ्यामुळं केळीची झाडं पडल्याने केळीचे घड अक्षरश: मातीत भिजल्या गेलेय. यात शेतकऱ्यांच एकरी जवळपास ३५ ते ४० टक्के नुकसान झालंय. अवघ्या दोन दिवसांवर केळी कापण्यावर आली होती, मात्र अवकाळी पावसाचा फटका बसल्याने शेतकऱ्यांकडं ऐनवेळी व्यापाऱ्यांनी पाठ फिरवलीय. अमोल काळे यांच्या शेतातील जवळपास साडेचार एकर पैकी दीड एकर केळीचे नुकसान झालं आहे.

तर अशीच परिस्थिती जिल्ह्यातील कांदा उत्पादकांची झालीय. यासोबतच अवकाळी पावसाचा तडाखा आता जनावरांना बसलाय. या पावसात शेतकऱ्यांच्या मेंढ्या भिजल्याने आजारी पडल्या आहेत. त्यामुळे मेंढापालन करणारे शेतकरी चिंतेत पडलेय.

जालन्यात देखील अवकाळी पावसाचा रब्बी पिकांना फटका बसला आहे. यात काढणीस आलेला गहू आणि मका पिकाचं मोठं नुकसान झालंय. जालन्यातील घनसांवगी तालुक्यातील शेवगळ आणि परिसरात सकाळच्या सुमारास झालेल्या अवकाळी पावसाने गहू आणि मका पिकाच नुकसान झालं आहे. तालुक्यातील शेवगळ आणि परिसरात अवकाळी पावसाने रब्बी हंगामातील मक्का आणि गहू पिकाच मोठा नुकसान झालं आहे. घनसावंगी तालुक्यातील शेवगळ आणि परिसरात सकाळच्या सुमारास अवकाळी पाऊस झाला आणि या पावसामुळे गहू आणि मक्का पिकाच मोठ नुकसान झालं. यामुळे काढणीला आलेला गहू आणि मका पीक अवकाळी पावसामुळे आडवं झाल्याचं पाहायला मिळाले,

दरम्यान या बेमोसमी अवकाळी पावसामुळे शेतकरी पुन्हा एकदा संकटात सापडला असून झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शासनाने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकर्यांनी केली आहे.

# ग्राहकांना शॉक!

## लाईट बिल कमी येणार नाहीच

**वीज दरकपातीच्या निर्णयाला आयोगाकडून स्थगिती**



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने नवीन वीज दर आदेशावर तात्पुरती स्थगिती दिली आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेडच्या विनंतीनुसार महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने २८ मार्च २०२५ रोजी जाहीर केलेल्या वीज दर आदेशाला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. हा आदेश १ एप्रिल २०२५ पासून नव्या दरकपातीचा निर्णय लागू होणार होता, परंतु त्यामध्ये काही स्पष्ट चुका असल्याचे महावितरणने निदर्शनास आणले आहे. त्यामुळे, आता महावितरणकडून करण्यात आलेल्या दरकपातीला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे, गेल्या काही दिवसांपूर्वी ग्राहकांना मिळालेला आनंद काही क्षणापुरताच राहिला असून त्यांना पुन्हा लाईट बिलाचा शॉक बसलाय, असेच म्हणावे लागेल.

महावितरणच्या वकिलांनी सांगितले की, या वीज दर आदेशातील चुका आणि विसंगती या वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० या पाच वर्षांच्या नियामक कालावधीतील वीज दराच्या मूळ स्वरूपावर परिणाम करत आहेत. तसेच, हा दर लागू केल्यास विविध प्रकारच्या ग्राहकांना आणि वीज वितरण क्षेत्रातील इतर संबंधित घटकांना मोठे आणि अपरिवर्तनीय नुकसान होऊ शकते. त्यामुळे या आदेशावर तातडीने स्थगिती द्यावी अशी मागणी महावितरणने केली आहे.

महावितरणच्या वकिलांनी यासंदर्भात सविस्तर पुनरावलोकन याचिका एप्रिल २०२५ च्या अखेरीस सादर केली जाईल, असे सांगितले. त्या पार्श्र्वभूमीवर आयोगाने २८ मार्च २०२५ रोजी जाहीर केलेल्या नवीन वीज दर आदेशाला तात्पुरती स्थगिती दिली आहे. तसेच, महावितरणची पुनरावलोकन याचिका दाखल होईपर्यंत ३१ मार्च २०२३ रोजी जाहीर झालेला आणि २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी लागू असलेला जुना दरच लागू राहील, असेदेखील आयोगाने स्पष्ट केले आहे.

>> पान २

# अखेर प्रतीक्षा संपली! भाजपला राष्ट्रीय अध्यक्ष कधी मिळणार? तारीख सुद्धा समोर आली



नवी दिल्ली : भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) नव्या राष्ट्रीय अध्यक्षाची प्रतीक्षा लवकरच संपुष्टात येऊ शकते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्ष एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत आपल्या पुढील अध्यक्षाची घोषणा करू शकतो. संसदेचे अधिवेशन संपल्यानंतर ही प्रक्रिया वेगाने पुढे जाईल. सध्या सुरू असलेले संसदेचे अधिवेशन ४ एप्रिल रोजी संपेल आणि त्यानंतरच भाजप आपल्या नवीन अध्यक्षांच्या निवडीची प्रक्रिया वेगवान करेल. पक्षांतर्गत हा बदल लवकरच पाहायला मिळणार असून एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात अध्यक्षांची घोषणा होऊ शकते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्ष लवकरच देशातील अनेक राज्यांच्या अध्यक्षांची घोषणा करणार आहे. यामध्ये उत्तर प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू आणि पश्र्चिम बंगालसारख्या मोठ्या राज्यांचा समावेश आहे. पुढील आठवड्यापर्यंत हे काम पूर्ण होऊ शकते.

>> पान २

# शिवसेना शिंदे गटाची राज ठाकरेंविरोधात बॅनरबाजी, दादरमध्ये मनसैनिक आक्रमक

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यविरोधात झालेल्या शिवसेना शिंदे गटाने केलेल्या बॅनरबाजीमुळे दादरम धील वातावरण काही वेळेसाठी तंग झाले होते. मनसैनिक चांगलेच आक्रमक झाले होते. यावेळी मनसैनिकांनी माजी आमदार सदा सरवणकर यांचे पुत्र आणि माजी नगरसेवक समाधान सरवणकर यांच्याविरोधात संताप व्यक्त केला. सरवणकरांच्या बॅनरबाजीने दादरमधील वातावरण तंग झाले होते.

शिवसेना शिंदे गटाचे दादर मधील माजी नगरसेवक समाधान सरवणकर यांनी राज ठाकरे यांच्या कुंभ मेळा आणि गंगा जल या वक्तव्याविरोधात होर्डिंग लावले. या बॅनरवर 'गंगाजल शुद्धच आहे पण काहींच्या विचाराचे काय?' असा सवाल केला. या होर्डिंगवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यास इतर राजकीय नेत्यांचा फोटो आहे. त्याशिवाय, पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही फोटो आहे.

शिवसेना भवनासमोर शिवसेना शिंदे गटाने लावलेल्या बॅनरमुळे मनसैनिक आक्रमक झाले. माजी आमदार असलेल्या सरवणकर यांचा प्रवास शिवसेना, काँग्रेस शिवसेना ठाकरे गट, आता शिवसेना शिंदे असा झाला आहे. सरवणकर यांनी राज ठाकरेंना हिंदुत्वाबाबत शिकवावं अशी वेळ आली नसल्याचेही मनसे नेते अविनाश अभ्यंकर यांनी म्हटले. समाधान सरवणकर यांनी लावलेला बॅनर हा एकनाथ शिंदे यांना मान्य आहे का, असा सवालही त्यांनी केला. मनसैनिकांच्या तक्रारीनंतर मुंबई महापालिकेने हे बॅनर हटवले.

एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरे यांच्या दोन सभा ठाण्यात मागितल्या होत्या. त्या धडाक्यात केल्या होत्या. कृतज्ञता व्यक्त करता येत नसेल तर कृतघ्न होऊ नका असे मनसे नेते अविनाश अभ्यंकर यांनी म्हटले.

मनसेच्या गुढीपाडवा म `ळाव्यात राज ठाकरे यांनी म्हटले होते की, बाळा नांदगावकर कुंभमेळ्यातून येताना माझ्यासाठी गंगाजल घेऊन आले होते. मात्र, पण ते पाणी मी प्यायलो नाही. त्यावेळी मग नव्याने वारं शिरलेल्या हिंदुत्ववाद्यांना वाटले की, मी कुंभमेळ्याचा अपमान केला म्हणाले की कुंभमेळ्याचा अपमान केला.

# तीन वाहनाच्या विचित्र अपघातात सहा ठार; १७ जण जखमी

## ➤ खामगाव - शेगाव रोडवर जयपूर लांडे फाट्याजवळ घटना

**दैनिक आपला विदर्भ**

**खामगाव/प्रतिनिधी :** तीन वाहनांच्या विचित्र झालेल्या अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला. तर, १७ जण जखमी झाले.यामध्ये सहा जण गंभीररित्या जखमी झाले आहेत. मन सुन्न करणारा हा भयानक अपघात खामगाव- शेगाव रोडवरील जयपुर लांडे फाटा समोर २ एप्रिल रोजी सकाळी ५ वाजताच्या दरम्यान घडला. घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार पुणे येथून परतवाडा येथे जाणाऱ्या एसटी बसला मागून चार चाकी वाहनाने आधी धडक दिली. त्यानंतर खाजगी ट्रॅव्हल्स ने या दोन्ही वाहनांना उडवले. सदर अपघात एवढा भीषण होता की, सहा जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, ६ जण गंभीररित्या जखमी झाले आहेत.







सदर अपघातात धनेश्र्वर मरावी रा. मध्यप्रदेश, कृष्णकुमार मोहन सिंह सरोते वय २० वर्ष, शिवपाल संतकुमार संयम वय २१ वर्ष रा. मध्यप्रदेश,शिवाजी समाधान मुंडे वय ५५ वर्ष रा. एसबीआय कॉलनी शेगाव, रंजीत वानखेडे वय ४० वर्ष रा. मूर्तिजापूर इंद्राणी ट्रॅव्हल्स मधील मेहरुनिसा शेख हबीब वय ४५ वर्ष रा. धुळे मालेगाव असे एकूण ५ पुरुष व १ महिलेचा मृत्यू झाला आहे. तर, शिव धनसिह धुर्वे वय ४७ वर्ष रा. मध्यप्रदेश, कोमल गणेश गंधारे वय ५९ वर्ष रा. अहमदनगर, प्रतीक्षा मुकुंदराव वांगे वय २६ वर्षे रा. ब्राम्हणवाडा थळी ता. चांदुर बाजार अमरावती. सत्यपाल गुलाबराव गवई वय ४० वर्ष रा.लावखेड ता. पातुर जि.अकोला, सुमन सुखदेवराव भोंडे वय ७० वर्ष रा. अंजनगाव सुर्जी जिल्हा अमरावती. सुखदेव अमृत भोंडे वय ८१ वर्ष रा. अंजनगाव सुर्जी जिल्हा अमरावती, दत्ता रामधन मोरखडे वय ४५ वर्ष रा. हिवरखेड रुपराव ता. तेल्हारा, बापूराव रामकृष्ण सवाने वय ८० वर्षे रा. वझर मे ता. निफाड जिल्हा नाशिक, साजिया परवीन शेख हबीब वय १० वर्ष रा. धुळे मालेगाव, शेख हबीब अब्दुल रजाक वय ५० वर्षे रा. धुळे मालेगाव, धनराज नागोराव उगले वय ३७ वर्ष रा. बिलोरा विमानतळ अमरावती, आशिष सुखदेवराव नवले वय ४० वर्ष रा. अमरावती, प्रल्हादराव शिवरामजी आवंडकर वय ७५ वर्ष रा. अंजनगाव सुर्जी, वरद चित्रांगण रेवंदले वय ६ वर्ष रा. फुरसुंगी पुणे, वंदना देवानंद पांडवकर वय ५१ वर्ष रा. अंजनगाव सुर्जी, पुरुषोत्तम नारायण शिनकर वय ७२ वर्ष रा. करजगाव तालुका चांदुर बाजार, शालिनी पुरुषोत्तम शिनकर वय ६५ वर्ष रा. करजगाव तालुका चांदूरबाजार. हे प्रवासी जखमी झाले आहेत सदर जखमी व्यक्तींवर सामान्य रुग्णालय खामगाव व जिल्हा सामान्य रुग्णालय अकोला येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अशी माहिती खामगाव चे तहसीलदार सुनील पाटील यांनी दिली आहे.

## वाहनांवर नियंत्रण आणायला हवे

साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पुणेकरांनी जोरदार वाहनांची खरेदी केल्याचे समोर आले आहे. गुढीाडव्याच्या दिवशी १० हजार १७० वाहनांची खरेदी केली. त्यात ६५१० दुचाकी, २४२४ चारचाकी, ५१७ गुड्स, २८३ रिक्षा, ६८ बस, २३४ टॅक्सी, १३४ अन्य वाहने पुणेकरांनी खरेदी केल्याची नोंद आरटीओत करण्यात आली. मागील वर्षापेक्षा या वर्षी वाहन खरेदीची संख्या तीन हजाराने अधिक आहे. मागच्या वर्षी याच काळात ७३३६ वाहनांची नोंद झाली होती याचाच अर्थ मागील वर्षी पेक्षा यावर्षी अधिक वाहनांची खरेदी पुणेकरांनी केली. आधीच पुणे शहरात वाहनांची संख्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. त्यात या दहा हजार वाहनांची भार पडली आहे. केवळ पुणे शहरातच एका दिवशी दहा हजारांपेक्षा अधिक वाहनांची खरेदी झाली याचाच अर्थ राज्यातील इतर शहरातही वाहनांच्या खरेदीने उच्चांक केला आहे. पुण्यापेक्षा मुंबई, ठाणे या शहरात अधिक वाहनांची खरेदी झाल्याची बाब समोर आली आहे. प्रत्येक शहरात साधारणपणे पाच हजार वाहनांची खरेदी झाल्याचे गृहीत धरले तरी हा आकडा खूप मोठा होतो. पुण्याप्रमाणेच मुंबई शहरातही वाहनांची संख्या अधिक आहे. मुंबईत चार चाकी आणि दुचाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहेत. शिवाय पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. वाढत्या वाहनांमुळे मुंबई, पुण्यातील प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे पण याची ना कोणाला फिकीर ना खंत. एकेकाळी पुणे शहर हे सायकलींचे शहर म्हणून ओळखले जायचे ती ओळख आता पुसली गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी कमालीची वाढली आहे. प्रदूषणामुळे दिल्लीची काय अवस्था झाली आहे ते आपण पाहतोच आहे, दिल्ली प्रमाणेच इतर शहरांची अवस्था व्हायला नको असेल तर वाहनांवर नियंत्रण आणायला हवे. नवीन वाहने विकत घेण्यापेक्षा बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर नागरिकांनी करायला हवा पण नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर विश्र्वास नाही. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे. म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. पुण्यामुंबई सारख्या शहरातील वाहनांची संख्या कमी करायची असेल तर बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना योग्य सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. प्रशासनाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्यास पुण्यामुंबईतील वाहनांच्या संख्येवर नियंत्रण येईल यात शंका नाही.

# कैलास नागरे यांना न्याय मिळवून दिल्याशिवाय शिवसेना स्वस्त बसणार नाही

## खोटी माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यावर हक्क भंग मांडणार : आमदार सिद्धार्थ खरात

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : देऊळगाव राजा तालुक्यातील शिवणी आरमाळ येथील युवा, शासनाचा कृषी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांनी परिसरातील १४ गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी सतत पाठपुरावा केला. शासन यंत्रणेची लढला. मात्र, त्यांना त्यामध्ये अपयश आल्याने त्यांनी आत्महत्या केली. शेती आहुती मागते असे म्हणून त्यांनी जगाचा निरोप घेतला. कैलास नागरे या तरुणां न्याय मिळवून दिल्याशिवाय शिवसेना स्वस्त बसणार नाही. यासंदर्भात मी सभागृहात वारंवार विषय उपस्थित केला आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी कैलास नागरे यांच्या मुलांचे शासन पालकतत्व स्वीकारले असल्याचे जाहीर केले आहे.**

यानंतरही शिवसेनेच्या वतीने पाच लाखाची मदत कैलास नागरे कुटुंबाला देण्यात आली आहे. शिवसेनाही कैलास नागरेला न्याय मिळवून दिल्याशिवाय शिवसेना स्वस्त बसणार नाही. अशी माहिती आमदार सिद्धार्थ खरात यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, शेती माणसाला मरू देत नाही, असे म्हणणारा युवा शेतकरी शेती आहुती मागतेय असे म्हणून आत्महत्या करतो, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. कैलास नागरे यांनी १४ गावातील पाण्यासाठी आंदोलने केले. परंतु, त्यांना यश आले नाही. कैलास नागरे यांचा हेतू हा अत्यंत चांगला होता. १४ गावातील शेतकऱ्यांना पाणी मिळाल्यास बागायती शेती करता येईल, त्यांचा आर्थिक विकास होईल. त्यामुळे त्यांनी पाणी मिळण्यासाठी सतत पाठपुरावा केला. मात्र, त्यामध्ये त्यांना यश आले नाही. कैलास नागरे हा व्यसनाधीन नव्हता, कर्जबाजारी नव्हता, शासन प्रशासनाने त्यांना साथ न दिल्याने त्यांनी स्वतः आहुती दिली आहे.मी हा प्रश्र्न अधिवेशनात मांडला आहे. मुख्यमंत्री यांनी त्यामुळेच कैलास नागरे यांच्या अपत्यांना शासनाने दत्तक घेतले आहे असे जाहीर केले आहे. त्यानंतर मी वैयक्तिकरित्या मुख्यमंत्री यांना भेटलो आणि कैलास नागरे यांच्या पत्नीला शासकीय नोकरी देण्याची मागणी केली. यावर मुख्यमंत्र्यांनी आम्ही याबाबत सकारात्मक निर्णय घेत आहोत. अशी माहिती दिली आहे. शिवसेना ही कायम शेतकऱ्यांच्या पाठिशी राहिली आहे. शेतकऱ्यांना कधीही शिवसेनेने एकटे पडू दिले नाही. शेतकऱ्यांच्या हितासाठी शिवसेना लढली आहे आणि लढत राहील. अशी माहिती ही आमदार खरात यांनी दिली. तसेच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे व विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या मार्गदर्शनात आत्महत्याग्रस्त कैलास नागरे यांच्या कुटुंबांना पाच लाखाची मदत केली आहे. मी इतर राजकीय पक्षांना सुद्धा आवाहन करतो की, त्यांनी कैलास नागरे यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी.१४ गावांना पाणीपुरवठा करण्यासंदर्भात अधिकाऱ्याने जी खोटी माहिती दिली आहे.त्या अधिकाऱ्याविरुद्ध अक्का भंग मांडणार आहे शिवणी गावाचा पाणी प्रश्र्न लावून धरणार आहे. त्याशिवाय शिवसेना स्वस्त बसणार नाही. शिवसेना कैलास नागरे यांना न्याय मिळवून देईल त्याचबरोबर १४ गावांना पाणी पुरवठा करण्यासंदर्भात सर्व अधिकारी आणि मुख्यमंत्री यांनी जी खोटी माहिती दिली आहे. त्या संदर्भात हक्कभंग आणणार आहे. अशी माहिती ही यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिली. तसेच यावेळी त्यांनी जलजीवन मिशनचा सावळा गोंधळ, घरकुल योजनेतील सावळा गोंधळ याबाबत सुद्धा चौकशी केली जाईल, निवडणूक काळात मी ज्या मुद्द्यावर बोललो आहे.त्यावर मी ठाम आहे आणि ते प्रश्र्न मार्गी लावण्यासाठी माझा सतत पाठपुरावा सुरू आहे. मतदारसंघातील बेरोजगारी कमी करण्यासाठी एमआयडीसी उभे करण्याचा प्रयत्न चालू आहे. विकासात्मक विकास करण्यावर माझा भर राहणार आहे. सध्या सात गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. उन्हाळ्यातील मागणीनुसार हा पाणीपुरवठा वाढवण्यात येईल, अशी माहिती त्यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना दिली.



## 'वफ्फ'च्या संपत्तीची एकूण किंमत किती? रिजजूंनी संसदेत सांगितली थक्क करणारी रक्कम

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकसभेत बहुचर्चित वक्फ सुधारणा विधेयक आज दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास मांडण्यात आले. अल्पसंख्याक व्यवहार मंत्री तसेच कायदा मंत्री किरेन रिजीजू यांनी हे विधेयक सभागृहात मांडले. भाजपाकडून या विधेयकावरील चर्चेमध्ये किरेन रिजीजू, अनुराग ठाकूर, जगदंबिका पाल, अभिजित गंगोपाध्याय, स्मिता वाघ, तेजस्वी सूर्या, निशिकांत दुबे सहभागी होणार आहेत. तर काँग्रेसकडून गौरव गोगोई, इमरान मसूद आणि मोहम्मद जावेद बोलतील. याचप्रमाणे शरद पवारांच्या पक्षाकडून या विधेयकावर निलेश लंके, फौझिया खान बाजू मांडणार आहेत. उद्धव ठाकरेंच्या पक्षाकडून अरविंद सावंत चर्चेत सहभागी होती. एकनाथ शिंदेंच्या पक्षाकडून त्यांचे खासदारपुत्र श्रीकांत शिंदे बाजू मांडतील, असं जाहीर करण्यात आलं.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी वक्फ बोर्ड विधेयक मांड्याण्यासाठी किरेन रिजीजू यांना बोलावलं. त्यावर काँग्रेसचे के. सी. वेणूगोपाल यांनी उठून विरोध करताना चर्चेसाठी कमी वेळ मिळत असल्याचं सांगितलं. त्यावर ओम बिर्लानी सांगितलं की, 'मी सत्ताधारी आणि विरोधक यांना समान वेळ दिला आहे.'' यानंतर किरेन रिजीजू हा बदल का अपेक्षित आहे हे सांगितलं.

पान १ वरून...

### ग्राहकांना शॉक!

महावितरणकडून महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे याचिका दाखल करण्यात आली होती. याचिका दाखल केल्यानंतर एमईआरसीकडून तात्काळ स्टे ऑर्डर देण्यात आली आहे. महावितरणचा तोटा वाढत नुकसान आणि ग्राहकांचे देखील हित नसल्याचं याचिकेत म्हटलं आहे. राज्यात १ एप्रिलपासून लागू होणाऱ्या नव्या दरासंदर्भात महावितरणकडून याचिका दाखल झाली होती. मात्र, महावितरणकडून पुनरावलोकन याचिका दाखल करेपर्यंत आता स्थगिती देण्यात आली आहे. एप्रिल महिन्याच्या शेवटाला पुनरावलोकन याचिका महावितरण दाखल करणार आहे. नियामक आयोगानं नफा दाखवत महावितरणच्या सर्वच गटातील ग्राहकांना दिलासा दिला होता. मात्र, महावितरणकडून तोटा होत असल्याचं सांगण्यात येत आहे.

### अखेर प्रतीक्षा संपली!

भाजपच्या राज्यघटनेनुसार निम्म्याहून अधिक राज्यांमध्ये संघटनात्मक निवडणुका झाल्याशिवाय राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवडणूक सुरू करता येत नाही. सध्या १३ राज्यांमध्ये संघटनात्मक निवडणुका पूर्ण झाल्या असून उर्वरित १९ राज्यांच्या अध्यक्षांची घोषणा होताच राष्ट्रीय अध्यक्षांची निवडणूक होणार आहे.

अलीकडे भाजप अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांचा कार्यकाळ अनेकवेळा वाढवण्यात आला आहे. २०१९ पासून ते या पदावर होते आणि आता २०२४ च्या लोकसभा निवडणुकीची तयारी पाहता त्यांना पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे. आता त्यांच्या जागी नवा अध्यक्ष निवडला जाईल, जो पक्षाच्या भवितव्याला दिशा देईल. भाजपसाठी हा काळ अत्यंत महत्त्वाचा आहे कारण पुढील लोकसभा (२०२९) निवडणुका होणार आहेत. अशा स्थितीत नवा अध्यक्ष पक्षाला भक्कम नेतृत्व देऊ शकेल आणि निवडणुकीच्या तयारीला मदत करेल, अशी पक्षाला आशा आहे. आता पक्षाचा पुढील अध्यक्ष कोण होणार आणि ते पक्षाला कोणत्या दिशेने घेऊन जाणार हे पाहावे लागेल.

## काय चाललंय? लग्नापूर्वीच 'या' अभिनेत्रीच्या बेबी बंपचा व्हिडिओ व्हायरल, चर्चांना उधाण..

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** 'आश्रम' फेम बबिता भाभी अर्थात त्रिधा चौधरीचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये त्रिधा तिचा बेबी बंप दाखवत असल्याचं दिसून येतं आणि त्यानंतर चर्चांना अक्षरशः उधाण आलं. कारण, अजून तिचं लग्न झालेलं नाही. त्यामुळे 'लग्नाशिवाय प्रेग्नेंसी?' असा प्रश्र्न अनेकजण विचारू लागले. मात्र या व्हिडिओमागचं सत्य काही वेगळंच आहे!

इंस्टाग्रामवरून व्हिडिओ शेअर :

त्रिधा चौधरीने १ एप्रिल २०२५ रोजी तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक व्हिडिओ शेअर केला. त्यात ती सोफ्यावर बसून आपल्या पोटावर हात ठेवत 'माझ्याकडे एक चांगली बातमी आहे' असं कॅप्शन देते. यानंतर सोशल मीडियावर चाहते आणि युजर्समध्ये खळबळ उडाली. अनेकांनी विचारलं की, त्रिधा प्रेग्नेंट आहे का? आणि जर आहे, तर वडील कोण? कारण ती सध्या अविवाहित आहे.

१ एप्रिल रोजी हा व्हिडिओ शेअर करण्यात आला होता. म्हणजेच एप्रिल फूल डे! त्यामुळे अनेकांनी हा केवळ प्रँक असावा असा अंदाज वर्तवला. पण त्रिधाचा हावभाव, बॉडी लँग्वेज आणि कॅप्शनमुळे अनेकांना ती खरंच गरोदर आहे असं वाटलं. काहींनी तर अभिनंदनाचे मेसेजही पाठवले.

व्हायरल व्हिडिओमागचं सत्य आलं समोर :

पण काही तासांनी त्रिधा चौधरीने स्वतःच या व्हिडिओमागचं सत्य उघड केलं. तिने एक फोटो पोस्ट करत लिहिलं, हा एक मुलगा आहे! सेज, द माल्टीपूला भेटा. म्हणजेच त्रिधाने प्रेग्नंसीची गुड न्यूज नसून, एक लहान कुत्र्याचं पिल्लू दत्तक घेतलं आहे. त्यामुळे ज्यांना वाटलं होतं की ती गरोदर आहे, त्यांना हा एक चांगला एप्रिल फूल मिळाला!

त्रिधा चौधरी ही 'आश्रम' मालिकेतून प्रचंड लोकप्रिय झाली होती. विशेषतः तिच्या बोल्ड सीनमुळे ती चर्चेत राहिली. अभिनयासोबतच ती तिच्या हॉट फोटोशूट्स आणि ग्लॅमरस लुकमुळे नेहमी सोशल मीडियावर सक्रिय असते. तिचे इंस्टाग्रामवर लाखो फॉलोअर्स आहेत आणि तिचे पोस्ट्स नेहमीच ट्रेंडमध्ये असतात.

## वडिलांसोबत दुकानाबाहेर गप्पा मारल्या अन् क्षणात भोसकले; बदलापुरात लेकाकडूनच जन्मदात्याचा खून

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** बाल लैंगिक हत्याचाराच्या घटनेने हादरेलले बदलापूर आणखी एका घटनेने हादरले असून पोटच्या लेकानेच वडिलांचा खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रॉपर्टी आणि पैशाच्या वादातून गप्पा मारता मारता ही घटन घडली. अनंत कराळे असे हत्या झालेल्या वडिलांचे नाव असून बेलवली परिसरात घडलेल्या या घटनेनंतर पोलिसांनी मुलगा गणेश कराळे याला ताब्यात घेतले आहे. पैसे आणि प्रॉपर्टीच्या वादातून हत्या करण्यात आल्याची शक्यता वर्तवण्यात येत असून पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

बदलापूरच्या बेलवली परिसरात अनंत कराळे यांचा एक व्यावसायिक गाळा असून तो खान कॅटरर्स यांना भाड्याने दिला आहे. या गाळ्यात मुलगा गणेश कराळे आणि त्याचे वडील अनंत कराळे हे बुधवार आज रोजी सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास आले होते. त्यानंतर भाडेकरूंना दुकानाच्या बाहेर काढून ते दुकानाच्या मागच्या बाजूला गप्पा मारण्यासाठी गेले. मात्र, याच वेळेस गप्पा मारता मारता त्यांच्यात वाद झाले आणि मुलाने वडिलांच्या पोटात धारदार शस्त्राने वार केले. या हल्ल्यात अनंत कराळे यांचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली.

# अवैध धंद्याला एसपी जबाबदार सभागृहात पुन्हा लक्षवेधणार

## ■ मेहकर लोणार मतदार संघातील अवैध धंदे बंद करण्याचे आदेश
## ■ आमदार सिद्धार्थ खरात पत्रकार परिषदेमध्ये माहिती


दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर लोणार मतदार संघात गत दोन ते तीन महिन्यांपासून अवैध धंद्यानी डोकेवर काढले आहे. या संदर्भात मतदार संघातील पोलीस यंत्रणेला व एसपींना माहिती देऊन अवैध धंदे बंद करण्याचे सुचना केल्या आहेत. त्याचबरोबर विधानसभेतही मतदारसंघातील अवैध धंद्याबाबत प्रश्र्न उपस्थित केला आहे. मतदार संघातील अवैध धंदे सुरू राहिल्यास याला एस पी व संबंधित वरिष्ठ अधिकारी जबाबदार राहणार आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी पुन्हा सभागृहात प्रश्र्न उपस्थित केला जाईल. अशी माहिती मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की, मतदार संघातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली आहे. मतदारसंघात वरली, मटका, जुगार, अवैध दारू विक्री खुलेआम सुरू आहे. पोलीस यंत्रणा हप्ते घेऊन हे सर्व पाहण्यात धन्यता मानत आहे. पोलीस यंत्रणा स्वतःच्या स्वार्थासाठी गोरगरिबांचा संसार रस्त्यावर आणत आहेत. या संदर्भात मी विधानसभा सभागृहात प्रश्र्न उपस्थित केला आहे.

एसपी आणि संबंधीत वरिष्ठ अधिकारी यांनाही जाब विचारण्यात आला आहे. मतदारसंघातील अवैध धंदे तात्काळ बंद न झाल्यास या संदर्भात मी एसपी व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याविरुद्ध कारवाईसाठी सभागृहात पुन्हा प्रश्र्न लावून धरणार आहे. त्यानंतरही एसपी यांनी इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्यात दिल्यास निर्णयात्मक भूमिका घेतली जाईल आणि मतदारसंघातील दारू अवैध दारू विक्री, वरली, जुगार, मटका आदी अवैध धंदे बंद करण्यासाठी माझे पुरेपूर प्रयत्न सुरू आहेत. या संदर्भात संबंधित पोलीस यंत्रणेला आदेश सुद्धा देण्यात आले आहेत.

पोलिसांनी आता याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास निर्णयात्मक भूमिका घेतली जाईल आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना कारवाई करण्यासाठी मागणी करण्यात येईल, अशी माहिती ही सिद्धार्थ खरात यांनी दिली.तसेच समृद्धी महामार्गावर अवैध धंदे सुरू आहेत. याबाबतही निर्णयात्मक भूमिका घेतली जाईल. पोलीस यंत्रणा नव्हे तर आता मी अवैध धंद्या संदर्भात कारवाई करून पोलीस यंत्रणेच हा निष्काळजीपणा चव्हाट्यावर आणला जाईल, अशी माहिती यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### मला फालतू गप्पा मारायला टाईमपास करायला आवडत नाही : अजित पवार



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** मी कामाचा माणूस आहे, मला फालतू गप्पा मारायला व टाइमपास करायला आवडत नाही.असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड जिल्हा दौऱ्यावर आले असता माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी ते म्हणाले की, महत्वाच्या मीटिंगसाठी बीड मध्ये आलो. सरकार चालवत असताना चांद्यापासून बांद्यापर्यंत कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती राहावी, अशी आमची भूमिका आहे.सर्व धर्म समभाव घेऊन चाललो. बेरजेच राजकारण करत आहोत. माझे आणि विनायक मेटे यांचे संबंध होते. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो.बीड शहरातील प्रश्न मांडले. निधीचा नीट उपयोग कसा होईल याचा प्रयत्न मी करतो.मी कामाचा माणूस आहे, मला फालतू गप्पा मारायला टाईमपास करायला आवडत नाही.बीड जिल्हा बँकेला सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करत आहे.बीड जिल्ह्यातील स्थलांतर रोखण्यासाठी प्रयत्न करू,हा तुमचा अजित पवार भाऊ कुठंही काही कमी पडू देणार नाही. अशी काही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### हिंदू, मुस्लिम वाद वाढवून सरकारकडून राजकारण केलं जातंय : आमदार जितेंद्र आव्हाड यांची टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजपला फक्त हे हवे आहे की देशात हिंदू आणि मुस्लिम वाद व्हावे. वक्फचा अर्थ सर्वांना माहित आहे, याचा अर्थ दानधर्म आहे आणि तो



समाजाच्या हितासाठी आहे. महाराष्ट्रात देशात निजाम प्रांत होता. त्या जमिनी नंतर वक्फ झाल्या. लालकिल्ला, ताजमहाल वक्फ झाला. तुम्ही लोकांची मने का खराब करत आहात. अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली. यावेळी ते म्हणाले की, पंडित धीरेंद्र शास्त्री म्हणाले, आम्ही हिंदू राष्ट्रासमोर कट्टर हिंदू बनवू. धर्मांध हिंदू ते ठीक करतील. पण आधी वर्णव्यवस्था रद्द करा. प्रथम हिंदू धर्मातील जातीवादाचा अंधार संपवा. आता आपल्याला संविधान स्वीकारावे लागेल, केवळ त्याचे कौतुक करायचे नाही. आणि त्यांना संविधान उद्ध्वस्त करायचे आहे. राज्यघटनेत 'स्वातंत्र्याचा अधिकार' असे म्हटले आहे. हा मूलभूत अधिकार आहे. असेही आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले.

### सरपंच पदाचे आरक्षण; १६ एप्रिला तहसिलनिहाय तर २५ एप्रिल रोजी महिला आरक्षण सोडत

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या अधिसूचनेनुसार जिल्ह्यातील ८७० ग्राम पंचायतींच्या सरपंच पदांची आरक्षण निश्र्चित करायचे आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम ३० अन्वये तसेच मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील तरतुदीनुसार सन २०२५ ते २०३० दरम्यान जिल्ह्यातील सार्वत्रिक निवडणूकीद्वारे गठीत होणाऱ्या सरपंच पदांचे आरक्षण दि. १६ एप्रिल २०२५ रोजी तहसिल स्तरावर निवडणूक अधिकारी तथा तहसिलदार हे निश्र्चित करणार आहे.

तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग अंतर्गत स्त्रीयांकरीता व खुल्या प्रवर्गाअंतर्गत स्त्रीयांकरीता आरक्षणाची सोडत जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली २५ एप्रिल रोजी स. ११ वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी याबाबतची सर्व लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच नागरीकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.



# देवेंद्र फडणवीस गजनी आहेत का ? : हर्षवर्धन सपकाळ

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी : खडकपूर्णाच्या डाव्या कालव्या संदर्भात देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासकीय मंजुरात देऊन त्याला सुप्रमाही प्रदान केली होती. त्या घटनेचा मी सुद्धा साक्षी आहे. आणि आता ते म्हणतात की ते पाणी दिल्या जाऊ शकत नाही. त्यांचा हे जर विधान असेल तर, त्यांनी एकदा तपासून बघावे तेव्हाचे तत्कालीन आमदार शशिकांत खेडेकर यांच्या वाढदिवसानिमित्ताने फडणवीस यांनी त्यांना हे गिफ्ट दिलं होते. आणि त्या पार्श्र्वभूमीवर डावा कालवा मंजूर केला होता. आता चक्क ते दिलेल्या आश्र्वासनावर आणि साइन केलेल्या फाईलवरून ते गुंजाळ करीत असतील तर त्यांनी त्याचा पुनर्विचार करावा. अथवा त्यांना गजनी म्हटल्याशिवाय आमच्याजवळ दुसरा पर्याय राहणार नाही, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर केली.**


माध्यमांशी ते बोलताना राज्यात सुरू असलेल्या राजकीय घडामोडींच्या पार्श्र्वभूमीवर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारवर टीकास्त्र सोडले. मंगळवारी रात्री ते मुंबईकडे रवाना होण्यासाठी शेगाव येथील रेल्वे स्टेशनला आले असता ते माध्यमांशी बोलत होते.



यावेळी ते पुढे म्हणाले की, राज्यात सध्या सुरु असलेल्या वाघ्या कुत्र्याच्या पुतळा निर्मिती संदर्भात वाद-विवाद सुरु आहे. यावर ते म्हणाले की, काही मंडळी बदनामी कारण लिखाण आणि चुकीचा इतिहास पसरवण्याच्या प्रयत्नात आहेत. राम गणेश गडकरी यांच्या पूर्वी वाघ्या कुत्र्याचा संदर्भ कोठे ही झालेला नाही. ऐतिहासिक स्वरूपाचे तथ्य तपासणे आवश्यक आहे. एकंदरीत जो इतिहास आहे.त्याचा शासनाने विचार करावा आणि समाजापुढे मांडावा. त्यातूच निर्णय घ्यावा. इतिहासाचं विकृतीकरण गेल्या अनेक दिवसांपासून केल्या जात आहे. सोबतच शिवाजी महाराजांबद्दल जे अक्षम्यस्वरूपाचे लिखाण केलेल्या ज्या प्रउत्ती आहे. त्यांचा देखील पर्दाफाश झाला पाहिजे. मज्जाव थॉट्स या पुस्तकामध्ये छत्रपती संभाजी महाराजबद्दल आणि सावरकरांनी त्यांच्या लिखाणात जे विकृत स्वरूपाचे लिखाण केले आहे. त्या पुस्तकावरही बंदी घालायला पाहिजे.देवेंद्र फडणवीस गजनी आहेत का ? अशी टीका पुन्हा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

ते म्हणाले की, खडकपूर्णाच्या डाव्या कालव्या संदर्भात देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासकीय मंजुरात देऊन त्याला सुप्रमाही प्रदान केली होती. त्या घटनेचा मी सुद्धा साक्षी आहे. आणि आता ते म्हणतात की ते पाणी दिल्या जाऊ शकत नाही. त्यांचा हे जर विधान असेल तर त्यांनी एकदा तपासून बघावं तेव्हाचे तत्कालीन आमदार शशिकांत खेडेकर यांच्या वाढदिवसानिमित्ताने फडणवीस यांनी त्यांना हे गिफ्ट दिलं होते. आणि त्या पार्श्र्वभूमीवर डावा कालवा मंजूर केला होता. आता चक्क ते दिलेल्या आश्र्वासनावर आणि साइन केलेल्या फाईलवरून ते गुंजाळ करीत असतील तर त्यांनी त्याचा पुनर्विचार करावा. अथवा त्यांना गजनी म्हटल्याशिवाय आमच्याजवळ दुसरा पर्याय राहणार नाही असे ते म्हणाले.१ एप्रिल पासून नागपूर-मुंबई या समृद्धी महामार्ग वरील टोल मध्ये १९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. यावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की,एकंदरीत जे शासन आहे ते जुलमी सरकार आहे. सत्तेवर येत असताना वारंवार आश्र्वासने दिली. आता टोल काय सर्वच वाढणार आहे याचं हे सुतोवाच आहे. असे मत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केले.

# ...तर दारुचे दुकान बंद होणार, नव्या नियमानु पिंपरी-चिंचवडमधील चार दुकान सं



**पिंपरी/प्रतिनिधी :** जर तुम्ही देखील एखाद्या वसाहतीत राहत असाल आणि त्या वसाहतीत दारूचे दुकान असेल तर त्याचा होणारा त्रास खास करून तिथे असणाऱ्या महिलांना होत असतो पण तो त्रास शब्दात सांगता येत नाही. या दारुच्या दुकानामुळे वसाहतीत राहणाऱ्या महिला, लहान मुलांच्या सुरक्षिततेचा देखील अनेकदा प्रश्न निर्माण होतात. पण आता या त्रासातून मुक्त होणे शक्य झाले आहे. पुण्यातील पिंपरी-चिंचवडमधील वसाहतीमध्ये आणि लोकवस्तीमध्ये असलेल्या दारूच्या दुकानांवर आता कारवाई करण्यात आली आहे.

पुण्यातील पिंपरी चिंचवडच्या चिखली आणि म ोशी या परिसरातील नागरिकांनी उत्साह आणि जल्लोष सुरू केला आहे. या नागरिकांच्या वसाहतीमध्ये दारूची दुकाने असल्यामुळे या नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. वसाहतीमध्ये दारूचे दुकान असल्यामुळे नागरिक दुकानासमोरच दारू पिऊन हुल्लडबाजी करत होते. बऱ्याचदा यामुळे वादाचे प्रसंग ही निर्माण होत होते. तरुणी आणि महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होत होता. मात्र, आता राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून लोकवस्तीमध्ये असलेल्या चार दुकानांवर कारवाई करत दारूची दुकाने आता सील करण्यात आली आहेत. त्यामुळे नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.


नुकत्याच झालेल्या विधानसभा अधिवेशनादरम्यान भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी वसाहतीमध्ये सुरु असलेल्या दारूच्या दुकानासंदर्भात प्रश्न उपस्थित करत त्यासंबंधीची नियमावली बदलण्याची मागणी केली होती. त्या मागणीला प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही वसाहतीमधील ५०म नागरिकांचा आक्षेप असेल तर त्या ठिकाणी दारूचे दुकान बंद केले जाईल असे स्पष्ट केले होते. त्याच बदललेल्या नियमावलींचा आधार घेत उत्पादन शुल्क विभागाने नागरिकांच्या मागणीनुसार चार दुकानांवर कारवाई करत ती सील केली आहेत. दारूच्या दुकानात संदर्भातील हा नियम फक्त पिंपरी चिंचवड नाही तर राज्यभरासाठी लागू आहे. त्यामुळे नागरिकांना दारूच्या दुकानाचा त्रास होत असेल तर त्यांनी विरोध नोंदवत ती बंद करावीत असं आवाहन महेश लांडगे यांनी केलं आहे. वसाहतीमध्ये दारूचे दुकान असणं ही वरकारणी शिल्लक बाब वाटत असली तरी त्याचा त्या वसाहतीत राहणाऱ्या नागरिकांना प्रचंड मनस्ताप होत असतो. त्यामुळे असा त्रास तुम्हाला होत असेल तर तुम्ही ही ते बंद करू शकता.

# विठ्ठलाच्या सर्वांगाला दीड किलो चंदनाचा लेप

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** दरवर्षी ग्रिष्म ऋतुमधील वाढत्या उन्हाच्या तीव्रते पासून विठुरायास शितलता मिळावी, या भावनेतून पाडव्या पासून चंदनउटी पुजेस प्रारंभ करण्याची परंपरा आहे. त्यामुळे सोमवारी पाडव्यापासून दररोज दीड किलो चंदनाचा लेप विठ्ठलाला लावण्यात येणार असून, ही पूजा मृग नक्षत्रापर्यंत चालणार आहे.

'राजस सुकुमार मदनाचा पुतळा, रविशशिकळा लोपलिया कस्तुरी मळवट चंदनाची उटी, रूळे माळ कंठी वैजयंती' संत तुकाराम महाराज यांनी विठुरायाच्या चंदन उटी पूजेचे वर्णन केले आहे. गुढी पाडव्यापासून विठ्ठल रुक्मिणीची चंदन उटी पूजा सुरू झाली आहे. मृग नक्षत्रापर्यंत चंदन उटी पूजा केली जाते. पाडव्या पासून



दररोज दुपारी चार वाजता मोठ्या भक्तीभावाने विठुरायाची चंदन उटी पूजा संपन्न होत असते. उन्हाळ्यातील असह्य करणाऱ्या उकाड्याबरोबरच तीव्र उष्णतेमुळे सर्वसामान्य माणसाच्या मनाची होणारी घालमेल आणि तगमग आपण नेहमीच अनुभवतो. उष्णतेचा मनुष्य आणि प्राणीमात्राला जसा त्रास होतो. तसाच देवांनाही होतो, अशी धारणा भक्तांमध्ये असते.

उन्हाळ्यातील उष्णतेपासून विठुरायाचे ही संरक्षण व्हावे व थंडावा मिळावा यासाठी दरवर्षी चंदन उटी पूजा केली जाते. ही परंपरा अनेक शतकापासून मंदिरात सुरू आहे. सध्या दररोज दीड किलो सुवासिक चंदन उगाळून त्याचा विठ्ठल आणि रुक्मिणीमातेच्या सर्वांगाला लेप लावला जातो. चंदन उटी पूजेमुळे नेहमीपेक्षा देवाचे रूप अधिक खुलून दिसते. हेच सुंदर देवाचे रूप डोळ्यांत साठवून ठेवण्यासाठी भाविक आतूर असतात. चंदन उटी पूजेसाठी दरवर्षी भाविकांकडून आगाऊ नोंदणी केली जाते. याच काळात मंदिर समितीला चांगले उत्पन्न ही मिळते. चंदन उटीपूजे नंतर देवाला शिरा, पोहे, सुका मेवा कैरीच पन्हे आणि थंड लिंबू सरबत असा खास नैवद्य ही दाखवला जातो. चंदन उटी पूजेसाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने कर्नाटकामधील बंगळूर, म्हैसूर येथून उच्च प्रतीचे सुंगधी ४०० किलो चंदन खरेदी केले आहे. पूजेसाठी रोज दीड किलो चंदन उगाळून त्याचा लेप देवाला लावला जातो. चंदन उटी पूजेमुळे देवाचे रुप सुवर्णालंकारा पेक्षाही उठून दिसते म्हणूनच अनेक भाविक चंदन उटी पूजा करून समाधान मानतात.

### खामगांव शासकीय वसतीगृहासाठी पाणी पुरवठादाराकडून निविदा मागविले

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वस्तीगृह खामगाव घाटपुरी येथे सन २०२५-२६ या सत्राकरिता विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी व स्नान स्वच्छतेसाठी टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहे. इच्छुक निविदाधारकांनी दि. ७ एप्रिल २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे, असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वस्तीगृहाचे गृहपाल देवराव बोथिंगे यांनी केले आहे.

# कर्जमाफीच्या मागणीसाठी शेतकऱ्याने जीवंत समाधी घेण्यासाठी खोदला खड्डा

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** कर्जमाफीच्या मागणीसाठी शेतकऱ्याने जिवंत समाधी घेण्यासाठी आपल्या शेतात खड्डा खोदला. नांदेडच्या देगलूर तालुक्यातील हाळी येथील शेतकरी शंकर जाधव पाटील असे या शेतकऱ्याचे नाव आहे. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी सरकारने मान्य केली नाही तर, येणाऱ्या ०३ मार्च रोजी शंकर जाधव पाटील हे जिवंत समाधी घेणार आहेत. विधानसभा निवडणुकी दरम्यान महायुतीने शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमाफी करण्याची घोषणा केली होती. निवडणूक झाली आणि महायुतीने सरकार स्थापन केले. सरकार स्थापन होऊन जवळपास





पाच महिने उलटली आहेत. परंतु महायुती सरकारने अद्याप शेतकऱ्यांची कर्जमाफी केली नाही. ३१ मार्च पर्यंत शेतकऱ्यांनी कर्ज भरावे, अशी सूचना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना केली आहेत. त्यामुळे राज्य शासनाच्या विरोधात सध्या शेतकरी आता आक्रमक होताना दिसत आहेत. कर्ज भरण्यासाठी किडनी विकणे आहे, अशा आशयचे बॅनर वासीम येथील एका शेतकऱ्याने आपल्या गळ्यात बांधून राज्य शासनाचा निषेध नोंदवीला होता. त्यानंतर आता नांदेडच्या देगलूर तालुक्यातील हाळी या गावातील शंकर जाधव पाटील या शेतकऱ्याने कर्ज माफीच्या मागणी साठी आपल्या शेतात जिवंत समाधी घेण्यासाठी खड्डा खोदाला आहे. ०३ मार्च रोजी शंकर जाधव पाटील हे जिवंत समाधी घेणार आहेत. जिवंत समाधी घेण्यावर ठाम आहेत. असे पत्रकारांशी बोलताना शंकर जाधव पाटील आंदोलन करता शेतकऱ्यांनी सांगितले आहे.

## विविध वृत्त...

### तहसीलदार व तलाठी अडकले लाच प्रकरणात; माती- मुरुम उत्खनन प्रकरण मिटविण्यासाठी मागितली २ लाख २० हजाराची रक्कम

**दैनिक आपला विदर्भ**

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूरचे तहसीलदार आणि सहकारी तलाठी असे दोघे लाच प्रकरणात अडकले. हे प्रकरण शेतातील माती- मुरूम उत्खनन केल्याचे होते. हे प्रकरण मिटविण्यासाठी तहसीलदार आणि तलाठी यांनी २ लाख २० हजाराची रक्कम मागितली. या रकमेतील १ लाख रु. शिल्लक राहिल्याने लाचखोरांनी सततचा तगादा लावला होता. तक्रारकर्त्या शेतकऱ्याने कंटाळून एसीबीला याची तक्रार केली. तहसीलदार अभय गायकवाड आणि कवडजई साजा चे तलाठी सचिन पुकळे यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तहसीलदाराला ताब्यात घेण्यात आले असून, तलाठी पुकळे फरार झाला आहे. ही कारवाई चंद्रपूर एसीबीने केली.

### सरकार येत्या दोन महिन्यात नाट्यगृह धोरण आणणार; सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांची माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

**वधा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकार येत्या दोन महिन्यात नाट्यगृह धोरण आणणार आहे.अशी



माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी दिली. ते येथे देवळी येथे नगर परिषद देवळीच्या वतीने बांधण्यात आलेल्या राजे छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाचे लोकार्पण तसेच विविध विकास कामाच भूमिपूजन करण्यात आले आहे. यावेळी बोलत होते

माध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले की,नाट्यगृह कुठे असावं, नाट्यगृह कसं बांधावं, ध्वनी मुद्रण आणि साऊंड व्यवस्था कशी असावी, त्यासाठीची उत्तम बांधणी कशी असावी, कलावंतांना, प्रेक्षकांना काय सुविधा असाव्या यासह अन्य बाबींचा विचार करून महाराष्ट्र सरकार येत्या दोन महिन्यात नाट्यगृह धोरण आणणार आहे.अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी दिली.

### महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची निवडणूक ; ३ एप्रिलला मतदान; वैद्यकीय व्यावसायिकांनी मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची निवडणूक आज गुरुवार, ३ एप्रिल रोजी पार पडणार असून, मतदान सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या २ एप्रिल २०२५ रोजीच्या आदेशानुसार, विद्यमान निर्वाचन अधिकाऱ्यांच्या जागी नवीन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार, राज्य शासनाने मंत्रालयातील वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे अवर सचिव सुनिलकुमार धोंडे यांची नवीन निर्वाचन अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

निवडणुकीसंदर्भात सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांना सूचना देण्यात आली असून, नियोजित वेळापत्रकानुसार मतदान होणार आहे. त्यामुळे सर्व वैद्यकीय व्यावसायिकांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने केले आहे.

### पाणी टंचाई निवारणार्थ चिखली तालुक्यातील श्रीकृष्णनगर येथे टँकर मंजूर

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता चिखली तालुक्यातील श्रीकृष्ण नगर येथे




पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे श्रीकृष्ण नगर येथे एका टँकरव्दारे नियमित पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती चिखली उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

श्रीकृष्ण नगर येथे ५६७ पशुधन व १ हजार ३७० लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ३८ हजार २४० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# केंद्रीय मंत्री ना. जाधव यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतली सहपरिवार सदिच्छा भेट



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी : केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव व राजेश्रीताई जाधव यांच्या लग्नाचा १ एप्रिलला ४८वा वाढदिवस होता.. त्यानिमित्त त्यांचा परिवार दिल्लीला एकत्र आला होता. २ एप्रिल रोजी ११ वाजता या परिवाराने पंतप्रधान कार्यालयात जावून नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. तब्बल १५ मिनीट चाललेल्या या भेटीत मोदी यांनी साधला तो कौटुंबीक संवाद.**

याप्रसंगी प्रतापराव जाधव यांनी विठ्ठल-रुख्मीणीची मुर्ती पंतप्रधानांना भेट दिली. तर मेहकरच्या शारंगधर बालाजींची प्रतिमा सौ.नम्रता सोहम वायाळ यांनी पंतप्रधानांना भेट देवून, भगवान बालाजीची ही सर्वात उंच मुर्ती असल्याचे सांगून लोणार, सिंदखेडराजा व लोणार ऐतिहासीक स्थळांची माहिती मोदीजींना दिली. यावेळी ना. जाधव यांनी पंतप्रधानांना बुलढाणा जिल्हा भेटीचे विशेष निमंत्रण दिले.

पंतप्रधान कार्यालयात नरेंद्र मोदी यांची ना. प्रतापराव जाधव, सौ.राजेश्रीताई जाधव, ऋषी जाधव, सौ.मयुरी जाधव, सोहम वायाळ, सौ.नम्रता वायाळ, श्र्लोक, ओवी व रणवीर यांनी भेट घेतली. 'जय महाराष्ट्र' करुन मोदी यांनी या परिवाराशी आधी मराठीतूनच संवाद साधत 'कसा झाला गुढीपाडवा?' हा प्रश्र्न विचारुन कौटुंबीक संवाद साधला. यावेळी संपुर्ण परिवारासोबत छायाचित्रेतर मोदीजींनी घेतलेच, परंतु वेगवेगळेही फोटोज त्यांनी प्रत्येकाला काढू देऊन आनंद द्विगुणीत केला.

## नरेंद्र मोदींना दिले बुलढाणा जिल्हा भेटीचे निमंत्रण!



## हा तर अदभूत अनुभव- ना.जाधव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची माझ्या कुटुंबासोबत भेट घेण्याचा अविस्मरणीय सन्मान मिळाला. मोदीजींचे प्रेरणादायी विचार व मार्गदर्शन आमच्यासाठी अत्यंत प्रेरणादायक ठरले. हा क्षण आम्ही सदैव जपून ठेवू! या अद्भूत अनुभवासाठी मनःपूर्वक आभार, पंतप्रधानजी!' अशी पोस्ट या भेटीनंतर केंद्रीय मंत्री ना.प्रतापराव जाधव यांनी त्यांच्या सोशल मिडीयावर शेअर केली आहे.

## ओवी व रणवीरला दिले चॉकलेट..

यावेळी ओवी व रणवीर या २ चिमुकल्यांना जवळ घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना चॉकलेट देऊन त्यांच्याशी गप्पा केल्या. 'काय केलस गुढीपाडव्याला ?' असा प्रश्र्न त्यांनी ओवीला विचारला. ती म्हणाली- 'आम्ही आधी गुढी उभारली, पूजा केली नंतर राम मंदिरात गेलो व घरी श्रीखंड-बासुंदी खाल्ली..' तिच्या या प्रश्र्नावर मोदीजी दिलखुलास हसले. मग तिला विचारलं- 'ओवीचा अर्थ काय ?' तिने तिच्यापरीनं सांगितला पण तिची आई नम्रताताईंनी तो सविस्तर सांगितलं. 'महाराष्ट्रात संतांनी जे अभंग लिहून ठेवलेयं, त्यातील प्रत्येक ओळीला ओवी म्हणतात..' रणवीरला मोदीजींनी आजोबाबद्दल कंप्लेंट विचारली. त्याला म्हटलं 'मराठीतून सांग मला कळते..' तुझे आजोबा जास्तवेळ दिल्लीला राहत असल्यामुळे तुझ्यासोबत त्यांना वेळ घालवायला भेटत नसेल, असे नंतर मोदीजीच म्हटले.नंतर त्यांनी श्लोकला विचारलं, त्यानं सीए करत असल्याबद्दल सांगितलं व पुढे यूपीएससीच्या माध्यमातून अधिकारी बनण्याचे स्वप्न असल्याचं तो बोलला. म्हणजे 'बापाच्याच वळणावर जाणार' असं म्हणून मोदीजी हसले.

विशेष म्हणजे आज संसदेत वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक मांडल्या जाण्याची घाई असतांनाही संपुर्ण परिवार भेटीला आल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपुलकीने साधलेला संवाद जाधव तथा वायाळ कुटुंबाला अर्थात भावून जाणारा ठरला.

## समता पंधरवड्यानिमित्त विशेष जात पडताळणी मोहिम

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात समता पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. त्यानुसार जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीतर्फे विशेष जात प्रमाणपत्र पडताळणी मोहिम हाती घेण्यात आली आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना आणि इतर अर्जदारांना जात वैधता प्रमाणपत्र त्वरित उपलब्ध करून देणे हा मोहिमेचा उद्देश आहे. १ एप्रिल ते १४ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यातील इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील सन २०२५-२६ मधील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रमाणपत्रे उपलब्ध करून दिली जातील. उच्च शिक्षण तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेण्यासाठी जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य असल्याने, कोणत्याही विद्यार्थ्याला या प्रक्रियेत अडथळा येऊ नये म्हणून विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील ११ वी १२ वी विज्ञान व डिप्लोमाच्या तृतीय वर्षातील सन २०२५-२६ मधील प्रवेशीत सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी समिती कार्यालयात परिपूर्ण अर्ज सादर करुन जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना त्रुटी पुर्ततेचा ई-मेल आलेला आहेत, त्यांनी समिती कार्यालयात उपस्थित राहून पुर्तता करुन या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संशोधन अधिकारी तथा समितीचे सदस्य सचिव मनोज मेरत यांनी केले आहे.

## पाणी टंचाई निवारणार्थ देऊळगांवराजा तालुक्यातील निमखेड गावासाठी टँकर मंजूर

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :**पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता देऊळगांवराजा तालुक्यातील निमखेड गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे निमखेड येथे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती सिंदखेडराजा उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांनी दिली.



निमखेड येथे १ हजार १९ पशुधन व ५८४ लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ३२ हजार लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# बुलेरो, एस.टी. बस आणि खाजगी ट्रॅव्हल्स तिहेरी अपघातानंतर केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचा जिल्हा शल्य चिकित्सकांना फोन

## जखमींना उपचार सुविधा आणि शव नातेवाईकांच्या सुपूर्त करण्यासंदर्भात केल्या सुचना

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शेगाव महामार्गावर झालेल्या तिहेरी भीषण अपघातातील मृतकांच्या प्रति दुःखत संवेदना व्यक्त करून मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्याच्या दृष्टिकोनातून तात्काळ कारवाई करण्याची निर्देश केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हा चिकित्सक डॉ.भागवत भुसारी यांना दिल्यात. दुपारी १ वाजेपर्यंत रुग्णालयाने सर्व प्रक्रिया पूर्ण केली होती...

बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शेगाव महामार्गावर बोलेरो गाडी आणि एस.टी महामंडळाची पुणे परतवाडा बसचा सकाळी ५ वाजेच्या सुमारास समोरासमोर अपघात झाला. त्याचवेळी पाठीमागून आलेली खाजगी ट्रॅव्हल्स ही जाऊन धडकली या तिहेरी भीषण अपघातामध्ये पाच जणांचा घटनास्थळी मृत्यू झाला. तर अपघातातील २४ जणांना खामगाव येथील शासकीय उपजिल्हा सामान्य रुग्णालयात उपचाराकरीता दाखल करण्यात आले. तर यातील तिघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना अकोला येथील शासकीय रुग्णालयात



पाठवण्यात आले. या अपघाताची माहिती मिळताच केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ.भागवत भुसारी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून अपघातग्रस्तांना तात्काळ वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिलेत.



सोबतच अपघातातील मृतकांचे शव त्यांच्या नातेवाईकांच्या सुपूर्द करण्याच्या सूचनाही दिल्यात. दरम्यान जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ.भागवत भुसारी यांनी खामगाव येथील जिल्हा उप सामान्य रुग्णालयाला भेट दिली. दुपारी एक वाजेपर्यंत अपघातातील शव नातेवाईकांच्या स्वाधीन करण्याच्या दृष्टिकोनातून प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. जखमींवर जिल्हा उप सामान्य रुग्णालयामध्ये उपचार करण्यात येत आहे.